अर्ज क्र. 245 6/4

# परिशिष्ट ब

महा/0000555/ना/21 4/10/2021

अर्जदाराचे नाव — मोतीवाला (नॅशनल) होमिओपॅथिक मेडीकल कॉलेज व हॉस्पीटल नाशिक, ॲल्युमनी असोसिएशन, नाशिक, ता. जि. नाशिक-४२२०१२

नक्कल सेवा शुल्क रुपये — पैसे भरण्याचा दिनांक

या संस्थेचे मेमोरँडम ऑफ असोशिएशन(निवेदनपत्र/ज्ञापन)

सार्वजनिक संस्था निबंधक

| | |
|---|---|
| १.संस्थेचे नाव | मोतीवाला (नॅशनल) होमिओपॅथिक मेडीकल कॉलेज व हॉस्पीटल नाशिक, ॲल्युमनी असोसिएशन, नाशिक, ता. जि. नाशिक-४२२०१२ |
| २.पत्ता द्वारा | मॅनेजिंग ट्रस्टी, मोतीवाला एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर ट्रस्ट, नाशिक , ता. जि. नाशिक-४२२०१२ |

३. संस्थेचे कार्यक्षेत्र :- महाराष्ट्र राज्य

४. प्रास्ताविक पुढील नमूद व्यक्तींनी एकत्र येउन बहुउद्देशिय व सामाजिक या क्षेत्रात काम करण्यासाठी सदर संस्था स्थापन करीत आहेत. तिचे ध्येय्य व उद्देश संस्था नोंदणी अधिनियमाचे कलम २० प्रमाणे राहतील. केंद्र शासन, राज्य शासनाने पारीत केलेले कायदे, अधिसूचना, नियम, शासननिर्णय यास अधिन राहून योग्य ती पूर्तता करुन, गरजेनुरुप परवानगी घेउन खालील ध्येय्य उद्देशांप्रमाणे काम केले जाईल. सदर उद्देश हे संपूर्ण सामाजासाठी असतील. संस्थेचे लाभार्थी व्यक्तीगत अथवा वैयक्तीक राहणार नाहीत, अथवा त्यासाठी संस्था काम करणार नाही तर संपूर्ण समाजासाठी काम करील

नक्कल अर्ज मिळाल्याचा दि.
नक्कल दिल्याचा दि. 21/10/21
नक्कल तयार करणार
नक्कल रुजावत करणार

संस्थेचे ध्येय्य व उद्देश-

१.माजी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून समाजिक सेवाभावी उपक्रम राबविणे, गोरगरीब,अंध अपंग, मुकबधिर व महिलांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न करणे, त्यासाठी आवश्यक त्या कार्यक्रमांचे आयोजन करणे.

२. माजी विद्यार्थ्यांमार्फत विद्यार्थ्यांना मदत, मार्गदर्शन करणे, त्यासाठी शैक्षणिकी सेवाभावी संस्था म्हणून काम करणे, त्यांना आरोग्य, कल्याण, शिक्षण या क्षेत्रातील प्रकल्पांचा लाभ मिळवून देणे, त्यांना मार्गदर्शन करणे, मार्गदर्शन कक्षाची सोय करणे.

३. मुकबधीर, अपंग, अंधशाळा, बाळगृह, वसतीगृह, वृध्दाश्रम, अनाथाश्रम, आधाराश्रम, आश्रमशाळासुरु करणे, त्याचे व्यवस्थापन करणे. महिलांना सक्षम,सजग,समृध्द करण्यासाठी सेवाभावी उपक्रमराबविणे, त्याची माहिती देणे,त्यासाठी शिक्षण-प्रशिक्षण देणे.त्यांना कायदेतज्ञांद्वारे माहिती देणे.बालके,
विद्यार्थी,युवक,युवती,महिला,जेष्ठ नागरिक,यांच्यासाठी सेवाभावी उपक्रम राबविणे.त्यांच्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन करणे.

४. महाविद्यालयाचा शैक्षणिक व सर्वांगीण विकास व त्यासाठी आवश्यक त्या सेवा सुविधा व सहकार्य करुन महाविद्यालयाला सर्वोत्कृष्ठ सेवेसाठी परिपूर्ण करणे तसेच महाविद्यायात शिक्षण घेणाऱ्या गोरगरीब, वंचित, मुकबधिर, अपंग, खेळाडु व विविध क्षेत्रात नेपुण्या मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण पुरविणे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण होताच रोजगार मेळावे घेऊन रोजगार उपलब्ध करुन देणे. तसेच योग्य त्या शिष्यवृत्ती उपलब्ध करणे व त्या अनुषंगाने आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देणे.

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
नाशिक विभाग, नाशिक

५.विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे, त्यांचा गौरव करणे.त्यांना शिक्षण,कलाविकास, आरोग्य, या सेवाभावी क्षेत्रातील संधी उपलब्ध करुन देणे. संगणक प्रशिक्षण, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व व्यक्तीमत्व विकासास आवश्यक प्रशिक्षण देणे.

६.महिलांना रोजगाराभिमुख शिक्षण-प्रशिक्षण देणे, त्यासाठीचे सेवाभावी प्रकल्प उभारणे.

७.अंधश्रध्देबाबत प्रबोधन करणे, त्याचे निर्मुलनासाठी प्रयत्न करणे.

८.माजी विद्यार्थ्यांना एकत्र आणुन विचारविनिमय घडविणे, त्यांच्यात सुसंवाद निर्माण करणे, त्यांच्यामार्फत शिक्षण क्षेत्रात सेवाभावी काम करणे.

सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग नाशिक

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सरचिटणीस

६. मोतीवाला (नॅशनल) होमिओपॅथिक मेडीकल कॉलेज व हॉस्पीटल नाशिक, ॲल्युमनी असोसिएशन, नाशिक, ता. जि. नाशिक-४२२०१२ या संस्थेच्या नियम व नियमावली प्रमाणे ज्या कार्यकारी मंडळावर सदरहू संस्थेची व्यवस्था व कारभार सोपविण्यात आला आहे, अशा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांची संपूर्ण नावे,पत्ते,हुद्दे,वय,व्यवसाय,राष्ट्रीयत्व खालीलप्रमाणे :-

| अ.क्र | नाव व पत्ता | हुद्दा/पद | व्यवसाय | जन्म तारीख | शिक्षण | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | **श्री. जगदीश मुरलीधर वाणी**<br>रा. लक्ष्मी निवास, एन. के. नगर, ड्रिम निवासमागे, शिवांगी नगर, पुनारोड, नाशिक | अध्यक्ष | वैद्यकिय | १४/०३/१९६९ | एम.डी. (एच.ओ.एम.) | भारतीय |
| २. | **डॉ. स्वानंद नारायण शुक्ला**<br>रा. ११ उपाकाल लक्ष्मी नगर, मलारीया स्टॉप, कॉलेजरोड, नाशिक-४२२००५ | उपाध्यक्ष | वैद्यकिय | २५/०३/१९७४ | डी.एच.एम.एस | भारतीय |
| ३. | **डॉ. विरेंद्र सतिषचंद्र जैन**<br>रा. बंगलो नं. ३९, गजपंथ हौसिंग सोसायटी, दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक-४२२००४ | सरचिटणिस | वैद्यकिय | ३०/०९/१९७३ | एम.डी. (एच.ओ.एम.) | भारतीय |
| ४. | **डॉ. अफजल पुथुपराकट कुट्टी**<br>रा. ३ एफ, माघ सेक्टर, भुजबळ फार्मरोड, सिडको, नाशिक-४२२००९ | खजिनदार | वैद्यकिय | ०६/०२/१९७४ | एम.डी. (एच.ओ.एम.) | भारतीय |
| ५. | **डॉ. खोजेम अब्बास लोखंडवाला**<br>रा. ऑलिव्ह पार्क, शंकर नगर, द्वारका, नाशिक-४२२००९ | सदस्य | वैद्यकिय | ०९/०२/१९७७ | डी.एच.एम.एस | भारतीय |
| ६. | **श्री. सहार सुमित सिंह**<br>रा. रो-हाऊस नं.११ अशोक अस्टोरीया गोवर्धन, गंगापुर, नाशिक-४२२२२२ | सदस्य | वैद्यकिय | २४/०४/१९९० | एम.डी. (एच.ओ.एम.) | भारतीय |
| ७. | **डॉ. रेहाना मोहम्मद नाबी शेख**<br>रा. प्लॉट नं. २०/२१, शहाजहान बिल्ला, समता नगर, मुंबई आग्रा हायवे, नाशिक | सदस्य | वैद्यकिय | १६/०६/१९८६ | एम.डी. (एच.ओ.एम.) | भारतीय |
| ८. | **डॉ गायत्री विशाल निंभोरे**<br>रा. २-पेरणा अपाटमेंट, माई लेले विदयालय, राठी अमराई जवळ, श्रीरंग नगर, गंगापुर रोड, नाशिक | सदस्य | वैद्यकिय | २२/१०/१९८३ | एम.डी. (एच.ओ.एम.) | भारतीय |
| ९. | **डॉ. रुता अमोल पाथरकर**<br>रा. प्लॉट नं. ३०, फ्लॅट नं. २, विशाखा सी.एच.एस. पी.एन.टी. कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक | सदस्य | वैद्यकिय | १३/०४/१९८३ | एम.डी. (एच.ओ.एम.) | भारतीय |

अध्यक्ष    उपाध्यक्ष    सरचिटणीस

७. मोतीवाला (नॅशनल) होमिओपॅथिक मेडीकल कॉलेज व हॉस्पीटल नाशिक, ॲल्युमनी असोसिएशन, नाशिक, ता. जि. नाशिक-४२२०१२ या संस्थेचे चे सदस्य जाहीर करतो की,नोंदणी संस्था अधिनियम १८६० प्रमाणे अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही एकत्र येउन वरील संस्था आज दि. ०१/०८/२०२१ रोजी स्थापन केली असून ती नोंदणी संस्था अधिनियम १८६० प्रमाणे नोंदणी करण्यासाठी आम्ही या विधानपत्रावर सह्या केल्या आहेत.

| अ.क्र | सभासदांचे नाव | हुद्दा/पद | सही |
|---|---|---|---|
| १ | श्री. जगदीश मुरलीधर वाणी | अध्यक्ष | [signature] |
| २ | डॉ. स्वानंद नारायण शुक्ला | उपाध्यक्ष | [signature] |
| ३ | डॉ. विरेंद्र सतिषचंद्र जैन | सरचिटणिस | [signature] |
| ४ | डॉ. अफजल पुथुपराकट कुट्टी | खजिनदार | [signature] |
| ५ | डॉ. खोजेम अब्बास लोखंडवाला | सदस्य | [signature] |
| ६ | श्री. सहार सुमित सिंह | सदस्य | [signature] |
| ७ ऋ | डॉ. रेहाना मोहम्मद नाबी शेख | सदस्य | [signature] |
| ८ | डॉ गायत्री विशाल निंभोरे | सदस्य | [signature] |
| ९ | डॉ. रुता अमोल पाथरकर | सदस्य | [signature] |

दि. ०१/०८/२०२१
नाशिक

सदर व्यक्तींना मी ओळखतो.
आज रोजी सह्या केल्या आहेत.

वकिलाचे नांव -
पत्ता-
सनद नं.-
(सहि व शिक्का)

ॲड. धनश्री सुरेश गायकवाड
बी.ए., एल.एल.बी.
रजि. नं. MAH3614/2008
पहिला मजला, मल्हार पार्क सोसायटी,
तपोवन, नाशिक. मो. 9850326092.

मंजूर/००००.५५५/२
४/१०/२०२१

## परिशिष्ट क

नियम व नियमावली

मोतीवाला (नॅशनल) होमिओपॅथिक मेडीकल कॉलेज व हॉस्पीटल नाशिक, ॲल्युमनी असोसिएशन, नाशिक, ता. जि. नाशिक-४२२०१२ या संस्थेची नियम व नियमावली

सहाय्यक संस्था निबंधक
नाशिक प्रदेश नाशिक

१. नियमावलीतील संदर्भीत शब्दांची व्याख्या :-

१.१ संस्था म्हणजे मोतीवाला (नॅशनल) होमिओपॅथिक मेडीकल कॉलेज व हॉस्पीटल नाशिक, ॲल्युमनी असोसिएशन, नाशिक, ता. जि. नाशिक-४२२०१२ ही संस्था होय.

१.२ अध्यक्ष म्हणजे मोतीवाला (नॅशनल) होमिओपॅथिक मेडीकल कॉलेज व हॉस्पीटल नाशिक, ॲल्युमनी असोसिएशन, नाशिक, ता. जि. नाशिक-४२२०१२ या संस्थेचा अध्यक्ष होय.

१.३ उपाध्यक्ष म्हणजे मोतीवाला (नॅशनल) होमिओपॅथिक मेडीकल कॉलेज व हॉस्पीटल नाशिक, ॲल्युमनी असोसिएशन, नाशिक, ता. जि. नाशिक-४२२०१२ या संस्थेचा उपाध्यक्ष होय.

१.४ सरचिटणीस म्हणजे मोतीवाला (नॅशनल) होमिओपॅथिक मेडीकल कॉलेज व हॉस्पीटल नाशिक, ॲल्युमनी असोसिएशन, नाशिक, ता. जि. नाशिक-४२२०१२ या संस्थेचा सरचिटणीस होय.

१.५ खजिनदार म्हणजे मोतीवाला (नॅशनल) होमिओपॅथिक मेडीकल कॉलेज व हॉस्पीटल नाशिक, ॲल्युमनी असोसिएशन, नाशिक, ता. जि. नाशिक-४२२०१२ या संस्थेचा खजिनदार होय.

१.६ सदस्य, सभासद म्हणजे मोतीवाला (नॅशनल) होमिओपॅथिक मेडीकल कॉलेज व हॉस्पीटल नाशिक, ॲल्युमनी असोसिएशन, नाशिक, ता. जि. नाशिक-४२२०१२ या संस्थेच्या कार्यकारीणीचे सदस्य, सभासद होय.

२. **कार्यक्षेत्र:-** महाराष्ट्र राज्य

३. **हिशेबाचे वर्ष :-** दि. १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.

४. **सभासदत्व व त्याच्या नोंदणीची पध्दत**

वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या कायद्याने सज्ञान असलेल्या **मोतीवाला (नॅशनल) होमिओपॅथिक मेडीकल कॉलेज व हॉस्पीटल नाशिक,** येथिल माजी विद्यार्थी असलेल्या भारतीय व्यक्तिस संस्थेचे सभासदत्व प्राप्त करता येईल. त्या व्यक्तीला संस्थेकडे रितसर अर्ज करावा लागेल. सभासदत्वाच्या अर्जावर अध्यक्षांची सही आवश्यक राहील.तो अर्ज मंजूर वा नामंजूर करण्याचा वा त्यावर योग्य तो निर्णय घेण्याचा अधिकार कार्यकारीणीस राहील.त्याबाबत तक्रार करता येणार नाही. अर्जाला कार्यकारीणीने मंजूरी दिल्यानंतर सभासदाची वर्गणी भरुन घेउन त्याची नोंद सभासदाच्या यादीत करण्यात येईल.

५. **सभासदांचे प्रकार(वर्गवारी)**

सभासदांचे दोन प्रकार राहतील.

अ) आजीव सभासद :- संस्थेला एकरकमी एकाचवेळी रु.५००/-(पाचशे रू. फक्त) सभासद वर्गणी येणारी व्यक्ती आजीव सभासद होईल.

ब) सर्वसाधारण वार्षिक सभासद :- संस्थेला ५०/-(पन्नास रू फक्त) सभासद वर्गणी देणारी व्यक्ती सर्वसाधारण वार्षिक सभासद होईल.

६. **सभासदत्व रद्द होणे**

कोणताही सभासद कायदेशीर गुन्हेगार ठरल्यास वा,सभासद वर्गणी न दिल्यास वा, मृत्यु पावल्यास वा, देश सोडून गेल्यास वा, गैरवर्तणूक करीत असल्यास वा, संस्थेला नुकसान पोहोचवित असल्यास वा,राजीनामा दिल्यास, कार्यकारी मंडळाने बहुमताने ठराव करुन काढून टाकल्यास सभासदत्व रद्द समजले जाईल.

७. **सर्वसाधारण सभा,तिचे अधिकार आणि तिचे कार्य**

सर्वसाधारण सभा ही संस्थेची सर्वोच्च व शेवटचा निर्णय देणारी सभा राहील.ही सभा वर्षातून किमान एक वेळा नियमानुसार घेतली जाईल. त्यात सर्व प्रकारचे सभासद भाग घेउ शकतील.कार्यकारी मंडळाच्या कार्यावर नियंत्रण ठेवणे,त्याबाबत आदेश देणे, वार्षिक हिशेब मंजूर करणे, अंदाजपत्रकास मंजूरी देणे, आवश्यकतेनुसार नियमात बदल करणे, यासह वेळेवर येणारे तसेच संदर्भात सर्व निर्णय घेण्यास सर्वसाधारण सभा सक्षम राहील.

८. **सर्वसाधारण सभेची सुचना व गणसंख्या**

सर्वसाधारण सभेची सूचना सर्व सभासदांना सभेपूर्वी किमान १५ दिवस अगोदर देणे बंधनकारक राहील. या सूचनेत(अजेंड्यात)दिनांक,वेळ,स्थळ,सभेचे विषय नमूद असले पाहीजेत. ही सूचना टपालाद्वारे वा संस्थेच्या पुस्तकात सही घेउन अथवा इमेल तसेच अन्य विधीमान्य ईलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून देता येईल.गणसंख्या एकुण सभासद संख्येच्या २/३ इतकी राहील.गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास नंतर घेण्यात येणाऱ्या सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही. मात्र तशी टीप सभेच्या सूचनेत असली पाहीजे.

**अध्यक्ष** **उपाध्यक्ष** **सरचिटणीस**

९. विशेष सर्वसाधारण सभा व तिचे कार्य

अशी सभा आवश्यकतेनुसार केव्हाही घेता येईल. सर्वसाधारण सभा करु शकते अशी सर्व कार्यें करण्याचा अधिकार या सभेला राहील.

१०. संस्थेचे कार्यकारी मंडळ,पदाधिकारी यांची रचना

संस्थेच्या कार्यकारी मंडळात किमान ९ व जास्तीत जास्त ११ पदाधिकारी राहतील. त्यात अध्यक्ष १,उपाध्यक्ष १ सरचिटणीस १, खजिनदार १ व उर्वरीत सर्व सदस्य असतील.

११. कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ व त्याच्या निवडीची पध्दत

कार्यकारी मंडळाचा कार्यकाल ५ वर्षांचा राहील. निवडणुकीची पध्दत सर्वसाधारण सभेत ठराव करुन बहुमताने निवडीची राहील. समसमान मतं पडल्यास एक कास्टींग मत देण्याचा अधिकार अध्यक्षांना राहील.

१२. कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांनी कार्ये

**अध्यक्ष** - सभेचे अध्यक्षस्थान स्विकारून कामकाज चालविणे, संस्थेच्या कारभारावर नियंत्रण ठेवणे, संस्थेसंदर्भात योग्य ते आदेश देणे.संस्थेच्या सभा बोलावणे, निर्णय घेणे.ठरावांची अंमलबजावणी करणे,संस्थेचे कागदपत्र तयार करणे, त्याचे रक्षण करणे.समसमान मत पडल्यास एक कास्टिंग मत देण्याचा अधिकार अध्यक्षांना राहील.

**उपाध्यक्ष**-अध्यक्षांना संस्थेच्या कामात मदत करणे, त्यांच्या अनुपस्थितीत परवानगीने अध्यक्ष म्हणुन कामकाज पाहणे ठरावांची अंमलबजावणी करणे,संस्थेचे कागदपत्र तयार करणे, त्याचे रक्षण करणे.

**सरचिटणीस**-संस्थेचा पत्र व्यवहार करणे,किरकोळ नियम तयार करणे, कर्मचाऱ्यांवर लक्ष ठेवणे, कोर्टकचेरीची कामे करणे,इतिवृत्त लिहीणे.

**खजिनदार**- संस्थेची हिशेबपत्रके तयार करणे, त्यांचे लेखापरीक्षण करुन घेणे,संस्थेचे हिशेब ठेवणे,मालमत्तेची नोंद ठेवणे, रक्कम अदा करणे वा स्विकारणे.

**सदस्य, सभासद** - संस्थेच्या कामात योग्य ती मदत करणे, सभेस उपस्थित राहणे, निवडणुकीत मतदान करणे.

१३ कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा

कार्यकारी मंडळाच्या वर्षातून दोन सभा घेण्यात येतील. संस्थेच्या २/३ सभासदांनी मागणी केल्यास १५ दिवसांच्या आत अध्यक्षांनी वा सचिवांनी कार्यकारी मंडळाची सभा बोलावणे बंधनकारक राहील.या सभेला कार्यकारी मंडळाच्या सभेचे सर्व अधिकार राहतील.

१४ कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना व गणसंख्या

कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना सर्व सभासदांना सभेपूर्वी किमान ७ दिवस अगोदर देणे बंधनकारक राहील.या सूचनेत(अजेंड्यात)दिनांक,वेळ,स्थळ,सभेचे विषय नमूद असले पाहीजेत. ही सूचना टपालाद्वारे वा संस्थेच्या पुस्तकात सही घेउन अथवा इमेल तसेच अन्य विधीमान्य ईलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून देता येईल.गणसंख्या एकुण सभासद संख्येच्या २/३ इतकी राहील.गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास नंतर घेण्यात येणाऱ्या सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही. मात्र तशी टीप सभेच्या सूचनेत असली पाहीजे.

१५. कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचे नियम

कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचे नियम सर्वसाधारण सभा ठरविल त्याप्रमाणे राहतील.सभासद वर्गणी बाकी असणाऱ्या सभासदास निवडणुकीत उमेदवारी करता येणार नाही तसेच मतदान करता येणार नाही.

१६. कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्याबाबत

कार्यकारी मंडळातील कोणतेही पद काहीही कारणास्तव रिक्त झाल्यास उर्वरीत कार्यकारी मंडळ अध्यक्षांच्या संमतीने सभा बोलावून रिक्त पद/पदे भरु शकेल. सहा महिन्यात सदर पद/पदे न भरल्यास सदर पदे भरण्याचा अधिकार मे. सहाय्यक धर्मदाय आयुक्त नाशिक विभाग यांना राहील.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सरचिटणीस

## १७ कार्यकारी मंडळाचे अधिकार व कामे

कार्यकारी मंडळ संस्थेच्या कारभारावर नियंत्रण ठेवील,सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या ठरावांची अंमलबजावणी करील.संस्थेचे कामकाज सुचारु पध्दतीने चालावे यासाठी किरकोळ नियम तयार करील,आवश्यकतेनुसार त्यात बदल करता येईल,एखाद्या कार्यासाठी समिती नेमू शकेल, त्यानंतर ती समिती रद्द करु शकेल, संस्थेच्या शाखा कार्यालयांना मान्यता देणे,ती काढून घेणे.संस्थेच्या कायदेशीर बाबी पूर्ण करणे, हिशेब ठेवणे, देयके मंजूर करणे,तक्रारींची दखल घेणे, रिक्त पदे भरणे, सभासदांना मंजूरी देणे, सभासदत्व नामंजूर करणे,सभासदास काढून टाकणे अशी वेळोवेळी आवश्यक ती सर्व कामे कार्यकारी मंडळ करील.

## १८. संस्थेचा निधी, मिळकत व विनीयोग

सभासद वर्गणी, देणगी, वर्गणी, फी, अनुदान व विविध उपक्रमातून येणारा निधी हे संस्थेचे उत्पन्नाचे साधन राहील.संस्थेच्या ध्येय्य उद्देशानुसार विधायक मार्गाने निधी गोळा करता येईल, तो स्थावर स्वरुपाच्या मिळकतीत गुंतविता येईल.

## १९. उद्दीष्टनिहाय खर्चाची तरतूद व उद्देशांवर खर्च करण्याचे बंधन

अ.ज्या उददेशाने रक्कम जमा केली असेल त्या उद्देशावर १०० टक्के खर्च करता येईल.

ब.संस्थेने ज्या उद्देशाने रक्कम,देणगी,निधी,मिळकत गोळा केली असेल त्याच उद्देशावर खर्च करता येईल

## २०. कर्ज व ठेवी यासंबंधी तरतूद

संस्थेला आवश्यकता भासल्यास कोणत्याही व्यक्तीकडून,संस्थेकडून वा बँकेकडून मे. धर्मदाय सह आयुक्त सो. नाशिक विभाग नाशिक यांच्या परवानगीने कर्ज वा ठेवी स्विकारता येतील.

## २१ स्थावर मालमत्ता खरेदी-विक्री करण्याबाबतची तरतूद

संस्थेला आवश्यकता भासल्यास मालमत्ता खरेदी करता येईल. त्यासाठी कार्यकारी मंडळाची बहुमताने मान्यता घ्यावी लागेल. स्थावर मालमत्ता विक्री करावयाची असल्याने मे. धर्मदाय सह आयुक्त सो. नाशिक विभाग नाशिक यांची परवानगी घ्यावी लागेल.

## २२. बँक खाते

संस्थेची शिल्लक रक्कम कोणत्याही राष्ट्रीयीकृत, सहकारी अथवा मान्यताप्राप्त बँकेत संस्थेच्या नावाने ठेवता येईल.संस्थेच्या वतीने सदर खात्याचे व्यवहार करण्यासाठी अध्यक्ष व सरचिटणीस अथवा खजिनदार अशा तीन पैकी दोन पदाधिकाऱ्यांच्या सह्या आवश्यक राहतील.या दोन पदाधिकाऱ्यांच्या संयुक्त सहीने रक्कम काढता येईल.

## २३ सभासदांची यादी ठेवण्याची पध्दत

संस्था नोंदणी संस्था अधिनियम १८६० प्रमाणे नियम १५ अ प्रमाणे संस्थेच्या सर्व सभासदांची यादी संस्था नोंदणी नियमावली १९७१ च्या नियम १५ प्रमाणे सह्यांसह विहीत नमुन्यात ठेवण्यात येईल.नोंदणी संस्था अधिनियम १८६० प्रमाणे कलम ४ व संस्थानोंदणी नियम ७ प्रमाणे दरवर्षी कार्यकारी मंडळाची यादी अनुसूची १ च्या नमुन्यात सहाय्यक निबंधकांचे कार्यालयात पाठविली जाईल.

## २४. नियम व नियमावलीत बदल करण्याची तरतूद व संस्थेचे स्वरुप

अ. संस्थेच्या नियम व नियमावलीत बदल करावयाचा असल्यास विशेष सर्वसाधारण सभेत संस्थेच्या सभासदांपैकी ३/५ सभासदांच्या मान्यतेने बहुमताने ठराव करुन नियम व नियमावलीत बदल केला जाईल. सदर सभेपूर्वी दहा दिवस अगोदर सर्वांना अजेंडा दिला जाईल. त्यांनतर संस्था नोंदणी अधिनियम १८६० च्या कलम १२ प्रमाणे कार्यवाही केली जाईल.

ब. संस्थेचे स्वरुप हे इरिव्होकेबल स्वरुपाचे राहील.म्हणजेच सदर संस्थेचे परस्पर विसर्जन करता येणार नाही. संस्थेची इरिव्होकेबीलीटी कलम २६ चे अधिन राहुन राहील.

## २५. संस्थेच्या नावात , उद्देशात बदल करण्याची तरतूद

अ. संस्थेच्या नावात ,उद्देशात अथवा कोणताही तत्सम बदल करावयाचा झाल्यास वा दोन संस्थाचें विलीनीकरण करावयाचे झाल्यास संस्था नोंदणी अधिनियम १८६० प्रमाणे कलम १२ वा १२अ प्रमाणे कार्यवाही केली जाईल.सदर बदल करावयाचा असल्यास विशेष सर्वसाधारण सभेत संस्थेच्या सभासदांपैकी ३/५ सभासदांच्या मान्यतेने बहुमताने ठराव करुन नियम व नियमावलीत बदल केला जाईल. सदर सभेपूर्वी दहा दिवस अगोदर सर्वांना अजेंडा दिला जाईल.

ब. संस्थेचे स्वरुप इरिव्होकेबल स्वरुपाचे राहील.

अध्यक्ष उपाध्यक्ष सरचिटणीस

## २६. विसर्जन

अ. संस्थेचे विसर्जन करावयाचे झाल्यास संस्था नोंदणी अधिनियम १८६० प्रमाणे कलम १३ व १४ प्रमाणे कार्यवाही केली जाईल.तत्पूर्वी सर्वसाधारण सभेत किमान ३/५ बहुमताने परवानगी घ्यावी लागेल. संस्थेच्या संदर्भातील घेणे-देणे यासह सर्व व्यवहार पुर्ण करावे लागतील.

ब. संस्थेच्या विसर्जनाचे वेळी संस्थेचा निधी,मिळकत ही समान उद्देश असलेल्या संस्थेला दिली जाईल. ती कुणालाही वैयक्तीक स्वरुपात दिली जाणार नाही.

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की ,सदर नियम व नियमावली मोतीवाला (नॅशनल) होमिओपॅथिक मेडीकल कॉलेज व हॉस्पीटल नाशिक, अॅल्युमनी असोसिएशन, नाशिक, ता. जि. नाशिक-४२२०१२ या संस्थेच्या नियम व नियमावलीची प्रत आहे.

| अ.क्र | सभासदांचे नाव | हुद्दा/पद | सही |
|---|---|---|---|
| १ | श्री. जगदीश मुरलीधर वाणी | अध्यक्ष | Jug |
| २ | डॉ. स्वानंद नारायण शुक्ला | उपाध्यक्ष | [signature] |
| ३ | डॉ. विरेंद्र सतिषचंद्र जैन | सरचिटणिस | [signature] |
| ४ | डॉ. अफजल पुथुपराकट कुट्टी | खजिनदार | [signature] |
| ५ | डॉ. खोजेम अब्बास लोखंडवाला | सदस्य | [signature] |
| ६ | श्री. सहार सुमित सिंह | सदस्य | [signature] |
| ७ | डॉ. रेहाना मोहम्मद नाबी शेख | सदस्य | Rehana |
| ८ | डॉ गायत्री विशाल निंभोरे | सदस्य | [signature] |
| ९ | डॉ. रुता अमोल पाथरकर | सदस्य | [signature] |

नाशिक

दिनांक:-०१/०८/२०२१

अध्यक्ष उपाध्यक्ष सरचिटणीस

सहायक धर्मदाय आयुक्त कार्यालय नाशिक विभाग नाशिक

सत्यप्रत

22 ... २१/०१/२०२३

अधिक्षक

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय

नाशिक विभाग नाशिक